Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)
A Peer Reviewed Multidisciplinary Journal UGC Approved Journal No 48178, 48818
Impact Factor 5.18 ISSN 2278-5655

# मराठी साहित्यातील राजकीय कादंबरीचा मानदंड

**निर्मोही गिरीश फडके**
*संशोधक विद्यार्थिनी*
*एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट,*
*मुंबई – २०*

**डॉ. सुनील रामटेके**
*संशोधन मार्गदर्शक*
*एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट,*
*मुंबई – २०*

ब्रिटीश राजवटीच्या काळामध्ये 'कादंबरी' हा साहित्यप्रकार मराठी भाषेमध्ये प्रामुख्याने रुजला आणि कालांतराने विकसित होत गेला. तत्पूर्वी, खंडकाव्य, पोथ्या – पुराणांमधील कथानके या स्वरूपांमध्ये तसेच 'लीळाचरित्र' सारख्या महानुभवी साहित्यातील लेखनप्रकारांमध्ये कादंबरीच्या रूपबंधाची बीजे विखुरलेली दिसतात. परंतु इंग्रजीतील 'नावेल' अर्थात Novel या कादंबरीच्या मूळ रूपबंधाशी मिळतीजुळती मराठी कादंबरी ही पेशवाईच्या अस्तानंतर, १९व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रजी राजवटीमध्ये लिहिली जाऊ लागली.

कादंबरी या साहित्यप्रकाराचा जो मूळ रूपबंध आहे, त्या रूपबंधाची अंगभूत अशी काही वैशिष्टये आहेत. त्यांच्या अनुषंगाने कादंबरीचे काही प्रकार साहित्यामध्ये अभ्यासले जातात. उदाहरणार्थ ऐतिहासिक कादंबरी, सामाजिक कादंबरी इत्यादी. यापैकीच राजकीय कादंबरी हा एक महत्त्वाचा प्रकार आहे.

'राजकीय कादंबरी म्हणजे काय ?'

'ज्या कादंबरीमध्ये देशाच्या विशिष्ट काळातील राजकीय जीवनावर अथवा राजकारणावर प्रकाश टाकला जातो, अथवा कल्पित कथानक आणि राजकीय घटना असे दोन धागे घेऊन कथानकाची वीण साधली जाते, त्या कादंबरीला राजकीय कादंबरी म्हणता येईल.' असे प्र. वा. बापट व ना. वा. गोडबोले यांनी आपल्या 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास' या ग्रंथामध्ये उद्धृत केले आहे.

वसंत आबाजी डहाके, हरिश्चंद्र थोरात, डॉ. अरुणा देशमुख इत्यादी अनेक विचारवंतांनी, समीक्षकांनी, अभ्यासकांनी 'राजकीय कादंबरी'चे सैद्धांतिक विश्लेषण केले आहे. तिची अभ्यासपूर्ण अशी लक्षणे सांगितली आहेत.

'मराठी कादंबरीच्या कालप्रवाहात सर्वार्थाने राजकीय कादंबरीचे स्वरूप घेऊन अगदी मोजक्याच कादंबऱ्या निर्माण झाल्या' इथपासून ते 'फक्त राजकीय पार्श्वभूमी असलेली कादंबरी म्हणजे राजकीय कादंबरी नव्हे', इथपर्यंत अनेक मतमतांतरे आढळून येतात.

या मतमतांतरांच्या गलबल्यात अधिक शिरकाव न करता गेल्या शतकातील मराठी राजकीय कादंबरीचा मानदंड म्हणून नावाजल्या गेलेल्या 'सिंहासन' या अरुण साधूलिखित कादंबरीविषयी नव्या शतकातील राजकीय, सामाजिक पार्श्वभूमीवर या लेखाच्या निमित्ताने सारांश रूपाने थोडक्यात विवेचन करत आहे.

स्वत: लेखक अरुण साधू यांनी 'सिंहासन' या कादंबरीसंदर्भात राजकीय कादंबरीवर भाष्य करताना मॉरिस एडमंड स्पियर या समीक्षकाच्या विचारांचा संदर्भ दिला आहे.

'........ राजकीय कादंबरी म्हणजे असे ललित गद्य की, जे भावभावनांपेक्षा विचारांवर अधिक लक्ष केंद्रित करते, कायदे करणाऱ्या यंत्रणेमागील तात्त्विक बैठकीवर भर देते व ज्याचा हेतू एखाद्या पदाचा अथवा विचाराचा प्रचार करण्याचा, सामाजिक, सुधारणेचा, शासन चालवणाऱ्या व्यक्तीचे आयुष्य वा शासन तोलून धरणाऱ्या शक्तींची गुंतागुंत यांचे विश्लेषण करण्याचा वा ते उघड करण्याचा असतो'.[२]

पत्रकारिता करणारा पत्रकार हा लेखक असतोच. परंतु पत्रकारितेमध्ये लेखनाच्या गरजा या वेगळया असतात. राजकीय कादंबरीसारखे ललित गद्यातील वाङ्‌मयीन शिवधनुष्य जेव्हा हा लेखक पेलतो तेव्हा त्या कादंबरीला लाभणारे स्वरूप हे वेगळया अर्थाने सिद्ध होते.

अरुण साधू यांची 'मुंबई दिनांक' ही राजकारणावर आधारित पहिली कादंबरी १९७२ साली प्रकाशित झाली. त्यानंतर १९७७ मध्ये 'सिंहासन' ही कादंबरी प्रकाशित झाली. एप्रिल २०१८ मध्ये 'सिंहासन' प्रकाशित होऊन उणीपुरी ४१ वर्षे पूर्ण होत आहेत.

चाळिशीमध्ये प्रवेश करणाऱ्या, मराठी साहित्यातील राजकीय कादंबरीचा मानदंड ठरलेल्या 'सिंहासन'चे स्वरूप, तिचा गाभा ज्या राजकीय गृहीतकांवर आधारित आहे ती गृहीतके आजही सत्याच्या कसोटीवर वाचकाला तितकीच शंभर टक्के पटतात.

एखादया नाटकाच्या संहितेप्रमाणे या कादंबरीचा प्रारंभ झाला आहे. नाट्यसंहितेच्या प्रारंभी ज्याप्रमाणे पात्रपरिचय करून दिला जातो, त्याप्रमाणे या कादंबरीतील पात्रांचा परिचय लेखक अरुण साधू हे वाचकांना करून देतात. या कादंबरीमध्ये ३१ मुख्य पात्रे आहेत. पात्रपरिचयानंतर भारतीय संविधानातील मंत्रीपदासाठी घेतली जाणारी प्रतिज्ञा वाचकांना वाचावयास मिळते. ही प्रतिज्ञा जी गांभीर्यपूर्वक घेतली जावी आणि सन्मानपूर्वक पाळली जावी अशी संविधानाकडून आणि सर्वसामान्य नागरिकांकडून अपेक्षा असते त्या प्रतिज्ञेच्या चिंधडया उडताना या कादंबरीच्या कथानकाद्वारा अनुभवणे आणि आजच्या परिस्थितीलाही हे सूर कसे संवादी होतात याची विदीर्ण अंत:करणाने प्रचिती घेणे हेच कादंबरीच्या अखेरीस वाचकाच्या नशिबी येते.

कादंबरीच्या कथानकाचा प्रारंभ तृतीयपुरूषी निवेदनाने होतो. शहरी जीवनाची रुक्ष अपरिहार्यता वर्णनात्मक पद्धतीने लेखक आपल्यासमोर मांडत जातात. यातूनच कादंबरीतील वैविध्यपूर्ण व्यक्तिरेखा आणि कथानक वाचकांसमोर उलगडत जाते. कथानक अर्थातच महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींशी निगडीत आहे. कथानकाची

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)
A Peer Reviewed Multidisciplinary Journal UGC Approved Journal No 48178, 48818
EduIndex Impact Factor 5.18 ISSN 2278-5655

सुरुवात मुंबईमधून होते. मुख्य नाटय जरी मुंबईमध्ये घडत असले तरी या नाटयाचे अनेक लहान लहान अंक महाराष्ट्रातील इतर प्रदेशांमध्ये लहानमोठया प्रमाणात रंगत जातात आणि त्यांचे एकत्रित पडसाद मुंबईच्या मूळ नाटयावर उमटताना दिसतात.

महाराष्ट्राचे वर्तमान मुख्यमंत्री, त्यांचे मंत्रीमंडळ, विरोधी पक्षातील आमदार, मंत्रीमंडळातील काही नाराज मंत्री आणि या सर्वांशी जोडली गेलेली तळागाळातील, मध्यमवर्गातील, प्रसारमाध्यमांतील अशी अनेक पात्रे. या सर्वांचे जीवनसंदर्भ एकमेकांना छेद देत जातात आणि 'सिंहासन'चे कथानक रंगत जाते. मुख्यमंत्रीपदासाठी मंत्री मंडळाच्या प्रत्येकाच्या मनामध्ये असणारी लालसा ही त्या व्यक्तीला किती आणि कोणत्या थराला घेऊन जाते याचे दाहक प्रत्यंतर ही कादंबरी वाचकाला देते.

मुख्यमंत्रीपदाच्या खालोखाल ज्या पदाला मंत्रीमंडळामध्ये महत्त्वाचे स्थान असते ते पद म्हणजे अर्थमंत्र्यांचे. कथानकांतील अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे यांनी अर्थमंत्रीपदाचा राजीनामा दिलेला असून ज्या मंत्र्यांच्या, आमदारांच्या मनामध्ये मुख्यमंत्र्यांबद्दल नाराजी आहे असे मंत्री, आमदार यांना एकत्रित करून स्वत:ची मुख्यमंत्रीपदासाठी दावेदार असण्याची ताकद ते सिद्ध करू पाहात आहेत, या मुख्य बातमीने कादंबरीच्या कथानकाची सुरुवात होते. दिगू टिपणीस ही या कथानकातील व्यक्तिरेखा या कथानकांच्या सूत्रधाराचे काम करते. व्यवसायाने पत्रकार असलेला, पन्नाशी ओलांडलेला, अविवाहित दिगू हा मुख्यमंत्र्यांच्या केबिनपासून ते मुंबईतील झोपडपट्टीपर्यंत सर्वत्र लीलया संचार करताना दिसतो. स्वत: पत्रकार असणाऱ्या लेखक अरुण साधू यांनी पत्रकार दिगू टिपणीस याची व्यक्तिरेखा रेखाटताना पत्रकारिता, प्रसारमाध्यमे आणि राजकीय वर्तुळातील त्यांचे स्थान याचे यथार्थ चित्रण केले आहे.

राजकीय कादंबरी हे सिंहासनचे मूळ स्वरूप असल्याने प्रत्येक व्यक्तिरेखा ही आपापले संचित घेऊन या राजकारणाच्या भोवऱ्यात कळतनकळतपणे अडकत जाते. काही व्यक्तिरेखांना आपण या स्वार्थी राजकारणाचे बळी ठरत आहोत किंवा या राजकारणामुळे आपले आयुष्य बदलत आहे याचा मागमूसही लागलेला दिसत नाही. उदाहरणार्थ दिगू टिपणीसकडे कामाला असणारी ईला खुरमांडे.
कथानकाच्या ओघामध्ये विविध व्यक्तिरेखांच्यामार्फत लेखकांनी राजकारणाविषयी जे विचारमंथन केले आहे ते आज ४० वर्षानंतरही जी राजकीय, सामाजिक परिस्थिती आहे तिला लागू ठरते. कादंबरीमध्ये एकामागोमाग येणारे असे अनेक उठावदार प्रसंग आहेत.

बुधाजी गोडघाटे या व्यक्तिरेखेच्या आयुष्याला कलाटणी देणारा एक प्रसंग आहे त्यातील काही भाग....
'विद्यार्थीदशेतील बुधाजी हा कॉलेजमध्ये वक्ते म्हणून आलेल्या नानासाहेब गुप्ते यांना संविधानाविषयी प्रतिप्रश्न करतो. तेव्हा एक संविधानतज्ज्ञ म्हणून नाना गुप्ते जे उत्तर देतात ते चाळीस वर्षांनंतरच्या आजच्या परिस्थितीलाही यथार्थपणे लागू ठरते. नानासाहेब गुप्ते आपल्या उत्तरात म्हणतात, '.................. संविधान ही अखेर श्रद्धेचीच

बाब ठरते. एकदा तुम्ही संविधान स्वीकारल्यावर मग दुसरा मार्ग नाही. दुसरा मार्ग म्हणजे सारं संविधान पुसून दुसरं लिहिण्याचा. म्हणजे क्रांतीचा. पण आहे ते संविधान काय एवढं दुर्बळ आणि कुचकामी आहे ? त्यांच्या मते, मुळीच नाही. या संविधानामध्येही सामर्थ्याची छुपी कारंजी आहेत. त्यांचा शोध घ्यायला हवा. बदल करण्याच्या तरतुदी आहेत..... प्रश्न आहे तो राबविण्याचा. अनेक चांगल्या तरतुदी केवळ राबविल्याच जात नाहीत, कागदावरच उरतात, म्हणून हे संविधानच पोकळ आणि दांभिक आहे, असा निष्कर्ष काढणं आततायीपणाचं होईल. दोष आहे, तो लिहिलेल्या शब्दांचा नसून ते राबविण्याची जबाबदारी ज्यांची आहे, त्यांचा शेवटी प्रश्न उरतो, तो सामाजिक वृत्तीचा. संपूर्ण सामाजिक जाणीव निर्माण झाल्याशिवाय त्या शब्दांचे खरे अर्थ, राबविणाऱ्या लोकांना मनापासून कळणार नाहीत. त्यासाठी सामाजिक क्रांतीच हवी. संविधानातून सहज सामाजिक क्रांती होईल, अशी अपेक्षा करणे बरोबर नाही. संविधानाबाहेरच्या शक्ती आणि संविधानातील शक्तिस्रोत यांनी परस्परांचा आधार घेत ही क्रांती घडवून आणायला हवी. याच मार्गाने आर्थिक क्रांती घडू शकते. संविधानाचे मूल्यमापन व्हायला हवे, ते या दृष्टिकोणातून. अशा या परस्परपूरक शक्तींना उपयोगात आणल्याशिवाय नुसत्या कागदी संविधानाला काय अर्थ आहे ?[३].

४० वर्षानंतरही आपली राजकीय, सामाजिक परिस्थिती आज 'जैसे थे' याच स्वरूपात आहे. म्हणूनच लेखक अरुण साधू यांनी या परिच्छेदातून नाना गुप्ते या व्यक्तिरेखेमार्फत वाचकांपर्यंत पोहोचवलेले संविधानाविषयीचे विचार हे आजही तितकेच अभ्यसनीय ठरतात. अशा अनेक प्रसंगांमधून आणि निवेदनांमधून 'सिंहासन' कादंबरीची 'कालातीतता' पटते.

कादंबरीमधील तृतीयपुरूषी निवेदकाची विविध घटनांविषयी, व्यक्तिरेखांच्या मानसिकतेविषयी असणारी व्यक्तव्ये ही भारतीय समाजव्यवस्थेवर केली गेलेली, त्रिकालाबाधित सत्य असणारी भाष्ये वाटतात. उदाहरणार्थ, समाजकल्याण उपमंत्री असणारा बुधाजी गोडघाटे हा मूळचा महारकी करणाऱ्या, दारिद्रयरेषेखाली असणाऱ्या कुटुंबातील तरुण. जातीच्या दाखल्यापासूनच राजकारण कसे भ्रष्ट आहे याचे अनेक दाहक अनुभव अजाणत्या वयात घेत मोठा झालेला. महाविद्यालयीन जीवनात त्याला या जातीपातीच्या राजकारणाचा कटू साक्षात्कार होतो आणि ''........................खरं म्हणजे आपली जात हाच आपला मोठा गुण ठरू शकतो—योग्य उपयोग केल्यास.''[४] याबद्दलची खूणगाठ तो मनात बांधतो. ही गाठ ४० वर्षानंतर अनेक बुधाजींच्या मनात अधिक घट्ट झाल्याचे आजच्या वाचकांच्याही लक्षात येते.

कादंबरीच्या कथानकामध्ये जितक्या प्रकर्षाने राजकीय प्रवाहांचे रंग गडद आहेत तितकेच त्यात ललितगद्यातील इतरही रंग सहजतेने मिसळले आहेत. परिणामकारक वर्णनात्मकता असणारे अनेक प्रसंग कादंबरीमध्ये आहेत. मुंबईच्या पावसाचे वर्णन, खेडेगावांतील वर्णन, दिगू टिपणीस, नाना गुप्ते, गोडघाटे, ईला खुरमांडे, श्रीपतराव शिंदे अशा अनेक व्यक्तिरेखांच्या मनातील विचारमंथने ही कादंबरीचे लालित्य खुलवतात.

अविवाहित दिगूच्या मनात त्याची मुलगी शोभेल अशा ईलाविषयी किंवा पस्तिशीतील स्वत:च्या मावस बहिणीविषयी येणारे लैंगिक विचार हे विकृत असूनही सहज वाटतात कारण ती माणसाची मूळ प्रवृत्ती आहे. विचार–अविचारांच्या अशा अनेक आंदोलनातून मानवी वर्तनाचे वैविध्य दाखवत लेखक वाचकांना अंतर्मुख करतात.

अर्थमंत्री दाभाडे यांच्या राजीनाम्याची बातमी दबक्या पावलाने राजकीय वर्तुळात पसरू लागते आणि महाराष्ट्रभर पसरलेले अनेक छोटेमोठे राजकारणी आपले राजकीय हितसंबंध चाचपण्यासाठी, आपली लहानमोठी राजकीय शक्ती आजमवण्यासाठी वेगवेगळया पातळयांवर हालचाली सुरू करतात. कादंबरीतील निवेदकाने या सर्व घटनांविषयी जी भाष्ये केली आहेत ती आज घडणाऱ्या कोणत्याही राजकीय घटनेचा कथनात्मक प्रारंभ म्हणून वापरली जाऊ शकतात. उदाहरणादाखल काहींचा येथे उल्लेख करत आहे.

‘......आणखी अनेक लाटांची वर्तुळं. एकमेकांत मावणारी, सतत प्रसरण पावत जाणारी, काही एकमेकांना छेदणारी, काही हलके तरंग, तर काही बुडबुडे’.[५]

‘......तशी ही खळबळ फार दूरवर पोचणं शक्यच नव्हतं. काही कचेऱ्या, काही घरं, काही दुकानं आणि वर्तमानपत्रांचे मथळे यांच्यापुरती मर्यादित राहणारी ही धावपळ होती. प्रत्यक्ष जीवनाला हिचा स्पर्श होणं कठीणच’.[६]

‘........महाराष्ट्रभर पसरलेली हजारो खेडी तर अजूनही निष्पापपणे अर्धवट साखरझोपेत असल्यासारखी आपल्याच तंद्रीत होती. इकडे काय चालू आहे, याचा त्यांना पत्ता नव्हता. असण्याचं कारण नव्हतं. कारण या सर्व खळबळींमुळे त्यांच्या जीवनावर यत्किंचितही परिणाम होणार नव्हता. त्यांच्या आयुष्यात हलकासा तरंगही उठणार नव्हता’.[७]

वरील परिच्छेदांमधून दिसून येणारी परिस्थितीची अपरिहार्यता कादंबरीच्या इतरही अनेक घटनांमधून वाचकाला जाणवते आणि सद्य:स्थितीशी तिचा संबंधही नकळतपणे लावला जातो. हेच तिच्या यशाचे एक महत्त्वाचे गमक आहे.

‘......सी.एम.नी स्वत: शेती केली नव्हती. त्यामुळे शेतीविषयात ते कमी रमत. त्यांचा ओढा उद्योगाकडे, शिक्षणाकडे. साहजिकच, पुण्या–मुंबईचे विद्वान लोक आणि उद्योगपती त्यांच्याभोवती रुंजी घालीत आणि शेतीच्या या महत्त्वाच्या बाबींकडे त्यांचे दुर्लक्ष होत होतं’[८]

शेती आणि शेतकरी हा महाराष्ट्रातील राजकारणाचाच नव्हे तर देशाच्याही राजकारणातील कळीचा मुद्दा. या मुद्दयावरून राजकारणात अनेक स्थित्यंतरे घडत आली आणि अजूनही होत आहेत. १९७७ साली जेव्हा ही कादंबरी प्रकाशित झाली तेव्हाही दुष्काळ आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे जिव्हारी लागणारे प्रश्न होते. आजही आहेत. परंतु दुष्काळी विभागातील भूकबळींवर इतर वेगळया पद्धतीने होणारे अत्याचार, त्यातून

रंगणारे स्थानिक राजकारण आणि त्याचे महाराष्ट्राच्या राजकारणावर अंतर्गतरित्या उमटणारे पडसाद याचे त्रिकालाबाधित सत्य सांगणारे नाटय 'सिंहासन'मध्ये अनुभवण्यास मिळते.

कादंबरीच्या शेवटच्या भागात लेखकांनी महाराष्ट्रातील पावसाला पार्श्वभूमीवर ठेवून राजकीय घडामोडींवर एखाद्या छायाचित्रकाराप्रमाणे कॅमेरा फिरवला आहे. पश्चिम महाराष्ट्रापासून सुरू झालेला हा पाऊस पुणे, मराठवाडा, विदर्भ असा फिरत दुष्काळी भागांना हिरवळ बहाल करतो, तसे महाराष्ट्राच्या राजकारणाचे वारेही आपली दिशा बदलतात. अनेक प्रकारचे शह—काटशह देत विद्यमान मुख्यमंत्री आपले सिंहासन टिकवून ठेवण्यात यशस्वी होतात.

तोच महाराष्ट्र, तेच साखर कारखाने, सहकारी बॅंका, कारखानदारी, शेती, कालवे, धान्य—धोरणे, दुष्काळ, शेतकरी—दलित वर्गातील आत्महत्या, त्याची ज्वलंत बातमी, राजकीय लागेबांधे, पश्चिम महाराष्ट्राबद्दलची कायमची नाराजी, जाती—पातींचे राजकारण, मुंबईतील झोपडपट्टीच्या समस्या, मुंबईचा पाऊस, वैयक्तिक आयुष्यांतील चुकांचे राजकारणात उभे केले गेलेले भूत आणि सरतेशेवटी ज्या जनताजनार्दनासाठी हा खेळ मांडला जातो त्यानेच या सगळ्या खेळाकडे दुर्लक्ष करून तो विस्मृतीत नेणे आणि पुन्हा नवा खेळ सुरू होणे. इत्यादी सगळया घटकांची सरमिसळ होऊन, बनलेल्या चौथऱ्यावर बसवलेले मुख्यमंत्र्यांचे सिंहासन.

४० वर्षांनंतरही आज तो चौथरा तसाच आहे आणि त्यावरील 'सिंहासन' व त्यासाठी खेळला जाणारा खेळही

तसाच चालू आहे हे दुर्दैव म्हणावे का ? इतक्या वर्षांनंतरही राजकीय कादंबरीचा मानदंड समजल्या जाणाऱ्या 'सिंहासन'चे हे कथानक ताजे वाटते हे लेखक अरुण साधू यांचे यश आहे. परंतु महाराष्ट्राच्या राजकीय परिस्थितीचे मात्र अपयश आहे.

**संदर्भ :—**


१. बापट प्र. वा. गोडबोले, ना. वा. 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास' व्हीनस प्रकाशन, पुणे. आ. ३री, १९७३, पृ. १८३.

२. साधू अरुण, 'राजकीय कादंबरी', मराठी वाड्.मयकोश — समीक्षा — संज्ञा — खंड ४था, संपादक विजया राजाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई २००२, पृ. २८५.

३. साधू अरुण, 'सिंहासन', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, अकरावी आवृत्ती, २०११, पृ. ८७.

४. तत्रैव, पृ. ८८.

५. तत्रैव, पृ. ३०.

६. तत्रैव, पृ. ३०.

७. तत्रैव, पृ. ३०.

८. तत्रैव, पृ. ३२८.

**संदर्भ ग्रंथ :—**

१. संपादक, डॉ. तिडके श्रीकांत, डॉ. नागरे शिवाजी, 'मराठीतील राजकीय कादंबरी' प्रतिमा प्रकाशन, पुणे. प्र. आ. ऑगस्ट २०११.

२. संपादन, सारडा शंकर, संकल्पना—संयोजक, वालावालकर कमलेश, 'कालदर्शी' अक्षय पब्लिकेशन्स, प्र. आ., जानेवारी २००७.

३. संपादन, खोले विलास, 'गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी'. लोकवाड्.मय गृह, प्र. आ. ऑगस्ट २००२.